दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २६६ । बुधवार २२ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

# एलसीबीच्या कारवाईत सहा जुगारी रंगेहाथ पकडले

## कामरगावात जुगार अड्ड्यावर छापा । पावणेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर तालुक्यातील कामरगाव शिवारात धाड टाकून ताडपत्रीच्या शेडमध्ये सुरू असलेल्या तिरट जुगार अड्ड्याचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी वाहने, मोबाईल आणि रोख रकमेसह एकूण ३ लाख ६९ हजार ९०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखालील पथक नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना, गुप्त बातमीदाराद्वारे कामरगाव येथे तिरट नावाचा जुगार खेळवला जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी छापा टाकला.

छाप्यादरम्यान ६ आरोपींना घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आले. आरोपींमध्ये चंद्रभान खोडवे, सोहम भिंगारदिवे, भाऊसाहेब ठोकळ, मनोज झरेकर (सर्व रा. कामरगाव), किरण भालके (रा. पिंपळगाव पिसा, श्रीगोंदा) आणि शिवाजी दिवेकर (रा. शिरूर,



पुणे) यांचा समावेश आहे. छाप्यावेळी चंद्रकांत दांदेवाड (रा. केडगाव) हा पळून गेला असून जुगार अड्डा चालवणारा गोरक्ष कातोरे (रा. कामरगाव) हा असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल (गु.र.नं. ६२८/२०२६) करण्यात आला आहे. पुढील तपास नगर तालुका पोलीस करत आहेत. ही यशस्वी कारवाई पोउनि कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार विष्णू भागवत, विजय पवार, सोमनाथ झांबरे, भीमराज खर्से, प्रकाश मांडगे आणि भगवान धुळे यांच्या पथकाने केली.

# अन्नदात्याला सुखी ठेवण्याची केली श्रीविठ्ठल चरणी प्रार्थना

## सभापती प्रा. शिंदे यांचे प्रतिपादन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पंढरपुर–** जगाचा अन्नदाता शेतकर्याला सुखी ठेवण्याची प्रार्थना आज श्रीविठ्ठल चरणी केल्याचे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज येथे केले. श्रीविठ्ठल व रुक्मिणी माता यांच्या दर्शनाने मन प्रसन्न झाले व महाराष्ट्र विकासात अग्रेसर असलेल्या महायुतीच्या सरकारमध्ये योगदान देण्याचा उत्साह अधिक वृद्धींगत झाला, अशी भावनाही प्रा. शिंदे यांनी व्यक्त केली.

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज बुधवारी (२१ जुलै) सकाळी आठच्या सुमारास पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या हस्ते पांडुरंगाची आरती केली गेली. पांडुरंगाच्या पुजार्यांद्वारे त्यांच्या गळ्यात तुळशी हार घालण्यात आला. यावेळी पांडुरंग चरणी नतमस्तक होत दर्शन त्यांनी घेतले व नंतर रुक्मिणी माता मंदिरातही जाऊन तेथे पूजा केली. त्यानंतर मंदिर समितीच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रा. शिंदे म्हणाले,



हेची दान देगा देवा, तझा विसर न व्हावा...या भावनेने पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनाला येणार्या भाविकांची पांडुरंग भेटीची ओढ पाहून प्रत्येकाच्या मनात भक्तीभाव जागृत होतो. आज पांडुरंग दर्शनासाठी जाताना दर्शन बारीत असलेल्या वारकरी भक्तांना आवर्जून भेटलो.

त्यांची ख्यालीखुशाली जाणून घेताना त्यांच्या मनातील भक्तीभाव जाणवला. अनेक अडचणींवर मात करीत पायी वारी करून पंढरपुरात पोहोचलेल्या वारकर्यांना

■ पान ४ वर

# रोपाला प्रेमाच्या व्यक्तीप्रमाणे जपा उपमहापौर– ॲड. धनंजय जाधव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल येथे विद्यार्थ्यांना वृक्षरोपांचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

यावेळी मार्गदर्शन करताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले, ''ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो, त्याच प्रेमाने प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या वाट्याला आलेल्या रोपाचे संगोपन करावे. रोपाला जिवंत व्यक्ती समजून त्याची काळजी घेतली, तर पर्यावरण संरक्षणाच्या या मोहिमेत विद्यार्थ्यांचा मोलाचा सहभाग नक्कीच अधोरेखित होईल.'' त्यांनी उपस्थित पालकांनाही या ग्रीन सिटी मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले.

मोहिमेचे कोअर कमिटी सदस्य इंजि. व ॲड. कैलाश दिघे यांनी विद्यार्थ्यांनी रोपाशी मैत्री करून त्याच्या वाढीचे नियमित निरीक्षण करावे, असे सांगितले. रोपांचे उत्कृष्ट संगोपन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोहिमेअंतर्गत विशेष बक्षिसे देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

प्रा. हर्षल आगळे यांनी पर्यावरण संवर्धनाशी संबंधित भविष्यात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध

■ पान ४ वर

# दिल्लीतील लाठीचार्ज हे विरोधकांचे पाप

## मंत्री उदय सामंत यांचा विरोधकांवर पलटवार

**सिंधुदुर्ग वृत्तसंस्था –** अभिजीत दिपके यांच्या माणसाने दिल्ली पोलिसांना मारहाण केली असं मी म्हणत नाही. मात्र, बाहेरून घुसलेल्या विरोधी पक्षाच्या लोकांनी हे कृत्य केले आहे. म्हणूनच तो लाठीचार्ज झाला, हे पाप विरोधकांचे आहे. आंदोलनामध्ये घुसखोरी केली नसती तर लाठीचार्ज झाला नसता, असा दावा मंत्री उदय सामंत यांनी केला आहे. दिल्लीतील लाठी चार्जवरून विरोधी पक्षाने सत्ताधारी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे, तर सत्ताधारी पोलिसांची पाठराखण करत आहेत.

सामंत म्हणाले की, नीट पेपरफुटीवरुन सुरू असलेल्या आंदोलनातील अभिजीत दिपके आणि विद्यार्थी यांच्याबद्दल आम्हाला शंभर टक्के आदरणीय सहानुभूती आहे. पण बाहेरून येऊन काहीजण नाटक करत आहेत. दिल्लीतील आंदोलनात विरोधक आपली माणसं घुसवत असल्याचा आरोपच त्यांनी केला. कोळसा, बोफोर्स किंवा टेलिकॉममध्ये भ्रष्टाचार झाला म्हणून राजीनामा मागितला जात नाही. तर विद्यार्थ्यांचे जीव गेले, त्याची संवेदना म्हणून हा राजीनामा मागितला जात आहे. त्यांना टार्गेट करण्यापेक्षा सिस्टम सुधारली पाहिजे आणि त्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत आहे, असे सामंत म्हणाले.

# रक्तदान, वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियानातून स्व. अजितदादा पवारांना मानवंदना

## रक्तदान शिबिरात १६७ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त पारनेर तालुक्यात समाजोपयोगी उपक्रमांची प्रेरणादायी मालिका राबविण्यात आली. सेवा, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीवर आधारित भव्य रक्तदान शिबिर, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन तसेच स्वच्छता अभियान अशा विविध उपक्रमांद्वारे स्व. अजितदादा पवार यांच्या सेवाभावी विचारांना अभिवादन करण्यात आले. या सर्व उपक्रमांना नागरिक, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आमदार काशिनाथ दाते जनसंपर्क कार्यालय, पारनेर येथे जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी ब्लड

■ पान ४ वर

# अहिल्यानगर महानगरपालिकेत स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अभिवान

## दादांच्या अकाली निधनाने राज्यासह अहिल्यानगरच्या विकासाचे मोठे नुकसान - महापौर ज्योतीताई गाडे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कार्याचा, दूरदृष्टीचा आणि राज्याच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण केली.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहेर लहारे, जल अभियंता परिमल निकम, इंजिनिअर सुरेश इथापे, गणेश गाडळकर, आदित्य बल्लाळ, गणेश पुंड, राजेंद्र मेहत्रे, अनिल लोंढे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्याने केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर अहिल्यानगर शहराचेही मोठे नुकसान झाले आहे. दादांच्या माध्यमातून आमदार संग्राम जगताप यांनी शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला होता. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे अनेक विकासकामांना गती मिळाली. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी अहोरात्र झटणारे, निर्णयक्षम आणि विकासाला प्राधान्य देणारे नेतृत्व आज आपल्यात नाही, ही खंत आजही प्रत्येकाच्या मनात कायम आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, स्वर्गीय अजितदादा पवार यांनी विकासाला दिलेली दिशा, लोकाभिमुख कार्यपद्धती आणि जनतेशी असलेली नाळ ही पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून समाजहिताची कामे पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

आयुक्त यशवंत डांगे यांनीही स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी दादांच्या कार्याचा स्मरणपूर्वक उल्लेख करत राज्याच्या विकासात आणि प्रशासनाला दिशा देण्यात त्यांच्या योगदानाची आठवण उपस्थितांना करून दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करत त्यांच्या लोकाभिमुख कार्याला आदरांजली वाहिली.

# कर्तव्य, कार्यक्षमता आणि जनतेशी नाळ जोडणारे नेतृत्व म्हणजे स्वर्गीय अजितदादा पवार - गिरीश कुलकर्णी

## स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे रक्तदान शिबिर
## रक्तदानातून समाजाप्रती बांधिलकी जपली; अजितदादांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रोफेसर कॉलनी चौक येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या कार्याचा, नेतृत्वाचा आणि जनतेप्रती असलेल्या समर्पणाचा गौरव करण्यात आला.

यावेळी स्नेहालयाचे संस्थापक गिरीश कुलकर्णी, जनकल्याण रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, बाळासाहेब पवार, निखिल वारे, महेश तवले, अजिंक्य बोरकर, सुनील त्रिंबके, महेश लोंढे, केशव नागरगोजे, रोहन सानप, पुष्कर कुलकर्णी, संजय मोरे, सतीश ढवण, योगेश ठुबे, धीरज उकिरडे, सचिन जगताप, स्वप्नील ढवण, महेश गलांडे, बाळासाहेब निकम, किरण बारस्कर, अजय दिघे, राहुल कातोरे, दिनेश खेडकर,



अंकुश बोरुडे, संकेत कराड, प्रशांत निमसे, ज्ञानदेव अकोलकर, आनंद राठोड, अमित गटणे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गिरीश कुलकर्णी म्हणाले की, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना आपल्यातून जाऊन काही महिने उलटले असले तरी त्यांच्या अकाली निधनाची हळहळ आजही प्रत्येकाच्या मनात कायम आहे. अतिशय संवेदनशील, शब्दाला, कामाला आणि वेळेला पक्के असलेले तसेच मंत्रिमंडळातील आपल्या खात्यावर संपूर्ण प्रभुत्व असलेले, महाराष्ट्राच्या समाजकारण, राजकारण आणि अर्थकारणाची सखोल जाण असलेले नेतृत्व म्हणजे स्वर्गीय अजितदादा पवार होत.

ते पुढे म्हणाले की, लोकांमध्ये दादांच्या असंख्य आठवणी आहेत. राजकारणात अनेकजण ''करू बघू'' असे म्हणतात; मात्र अजितदादा होणारे काम तातडीने पूर्ण करायचे आणि जे शक्य नसेल ते स्पष्टपणे सांगायचे. जनतेला हेलपाटे मारायला त्यांनी कधीही लावले

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### प्रवेशासाठी कॉलेज निवडताना 'या' गोष्टींची घ्या काळजी

अहिल्यानगर- माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील वाढत्या संधींमुळे आज मास्टर ऑफ कम्प्युटर ॲप्लिकेशन्स या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांची मोठी पसंती मिळत आहे. मात्र, सध्याच्या काळात सर्वात मोठी आणि गंभीर समस्या ही समोर येत आहे की विद्यार्थी कॉलेजमध्ये लेक्चर्सला उपस्थित राहत नाहीत. या गैरहजेरीचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटवर आणि एकूण करिअरवर होत आहे. पदवी मिळवण्यासाठी केवळ कोणत्याही कॉलेजमध्ये प्रवेश घेणे आणि क्लासला न जाणे भविष्यासाठी धोक्याचे ठरू शकते. त्यामुळे एमसीएचे दोन वर्ष यशस्वी करण्यासाठी कॉलेज निवडताना कोणती काळजी घ्यावी आणि कॉलेजमधील उपस्थिती का महत्त्वाची आहे, याचा हा सविस्तर आढावा. १. कॉलेज निवडताना घ्यायची काळजी उत्कृष्ट शिक्षण पद्धती: कॉलेज निवडताना तिथली शिकवण्याची पद्धत कशी आहे याला सर्वात पहिले प्राधान्य द्या. प्राध्यापक तंत्रज्ञान केवळ पुस्तकी न शिकवता प्रॅक्टिकली कसे समजावून सांगतात, हे जाणून घेणे गरजेचे आहे.खास मेंटरिंग आणि समुपदेशन सुविधा : कॉलेजमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वैयक्तिक मेंटरिंग आणि काउन्सेलिंगसुविधा आहे का, हे आवर्जून तपासा. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, ताणतणाव आणि करिअरविषयक संभ्रम दूर करण्यासाठी तज्ज्ञांचे मोलाचे मार्गदर्शन मिळते.

### समन्वयाच्या अभावामुळे 'फुटबॉल' दुर्लक्षित - रफिक मुन्शी



अहिल्यानगर- भारतात क्रिकेट निश्चितच सर्वाधिक लोकप्रिय झालेला आहे.त्याची कारणे ही विविध आहेत.खेळाडूंना मिळणाऱ्या मूलभूत सुविधा,तालुका,जिल्हा आणि राज्य पातळीवर असणाऱ्या प्रबळ संघटना,त्यातून सातत्याने आयोजित होणाऱ्या स्पर्धा,आर्थीक पाठबळ इ.हि कारणं आहेत.याउलट फुटबॉल च्या कमकुवत संघटना, खेळाडूंना मूलभूत सुविधा नगण्य,आर्थीक पाठबळ नाही,स्पर्धा सातत्याने न होणे इ.कारणे आहेत.क्रिकेट च्या शाळेपासून,महाविद्यालय,स्पर्धा गावापासून जिल्हा पातळीवर होतात, तश्या फुटबॉल च्या होत नाहीत.भारतात ३९ कोटी फुटबॉल प्रेमीनी विश्वकरंडक पाहिला,म्हणजे या खेळाचे चाहते आहेत.विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धे त छोटे,छोटे देश भाग घेऊ लागले आहेत,त्यांनी काय सुविधा निर्माण केल्या,कसे खेळाडू तयार केले,प्रशिक्षण कसे दिले ? याबाबत अभ्यास करून शासन,संघटना आणि त्या खेळातील तज्ञांनी समनव्यातुन विकास करणे योग्य राहील. तर नक्कीच आपला भारत सुद्धा भविष्यात विश्वकरंडक स्पर्धेत यश मिळवेल असा विश्वास आहे.

# अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवकांची सहकारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## सभासदांचा विश्वास हेच पतसंस्थेचे खरे बळ; पारदर्शक कारभारामुळे संस्था सक्षम – अजय महाजन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर यांच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन श्री समर्थ विद्यामंदिर, सांगळे गल्ली, अहिल्यानगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष श्री. श्रीनिवास म. मुत्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वार्षिक अहवाल, आर्थिक ताळेबंद, लेखापरीक्षण अहवाल, अंदाजपत्रक तसेच संस्थेच्या विविध प्रशासकीय विषयांवर सविस्तर चर्चा करून आवश्यक ठरावांना सभेने मंजुरी दिली.

सभेच्या प्रारंभी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. त्यानंतर सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील अध्यक्षांचा अहवाल, वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, ताळेबंद, नफा-तोटापत्रक, नफा वाटप तसेच सन २०२६-२०२७ या वर्षासाठीचे अंदाजपत्रक सभेपुढे सादर करण्यात आले. त्याचबरोबर हिशोब तपासणीची नियुक्ती, दोष दुरुस्ती अहवाल, उपविधी दुरुस्ती तसेच इतर प्रशासकीय विषयांनाही सभेने मंजुरी दिली.

यावेळी मानद सचिव अजय महाजन यांनी संस्थेच्या गेल्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेताना सांगितले की, संस्थेने सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्हतेच्या तत्त्वांवर सातत्याने कार्य केले आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीतही पतसंस्थेने आपली आर्थिक घडी मजबूत ठेवत सभासदांना आवश्यक त्या सर्व सेवा वेळेत उपलब्ध करून दिल्या. संचालक मंडळ, अधिकारी व सभासद यांच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगती सातत्याने होत असून भविष्यातही अधिक दर्जेदार आणि आधुनिक सेवा देण्यासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाजन पुढे म्हणाले की, शिक्षक व सेवकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सहकार चळवळ अधिक बळकट करण्याची गरज आहे. सभासदांनी संस्थेच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, नव्या सभासदांची नोंदणी वाढवावी आणि संस्थेच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सभासदांचा विश्वास, शिस्तबद्ध आर्थिक व्यवहार आणि संचालक मंडळाचे एकत्रित प्रयत्न यांच्या जोरावर संस्था आगामी काळातही प्रगतीची नवी उंची गाठेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# विलास भुमरे यांची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदी निवड



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठणचे आमदार विलास बाप्पू भुमरे यांची छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदी निवड झाल्याने पैठण तालुक्यासह जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या निवडीबद्दल भैय्या चेअरमन व आदिल कट्यारे यांनी आमदार भुमरे यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची प्रगती होऊन शेतकरी, सभासद आणि ग्राहकांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# आरोग्यवर्धिनी योग व निसर्गोपचार संस्था, अहिल्यानगरचा शंभर टक्के निकाल



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील आरोग्यवर्धिनी योग व निसर्गोपचार संस्था संचलित तथा मान्यताप्राप्त एम. ए. योग (प्रथम व द्वितीय वर्ष) अभ्यासक्रमाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून संस्थेने १०० टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे.

या निकालामध्ये अंतिम वर्षातील विद्यार्थिनी प्रणिता तरोटे हिने प्रथम क्रमांक मिळवून संस्थेचा गौरव वाढविला आहे. तसेच डॉ. दीपराज वाघुळे, दिप्सीका कराचीवाला आणि डॉ. स्वाती समुद्र यांनीही यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे शिक्षक मयूर कांगणे, ज्योती चोपडे, सफिया लोखंडे, हेमा शेलोट शैलजा घुले आणि ऋतुजा गिते यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेच्या अध्यक्षा हेमंगिनी पोतनीस मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांना भविष्यात अधिक प्रगती करण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित केले.

संस्थेच्या या शंभर टक्के निकालामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थेच्या सर्व पदाधिकार्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे व नवीन वर्षासाठी एम. ए. योगा डिप्लोमा योगा अँड इन नॅचरोपॅथी या कोर्ससाठी ॲडमिशन सुरू झाले आहेत. तसेच पुढील कोर्सची माहिती मिळवण्यासाठी ९४२२०७३५९०, ८२०८५२६४०३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# डॉ.पाऊलबुधे बी.फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वसंत टेकडी येथील डॉ.एन.जे. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी येथील बी.फार्मसी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सीजीपीए () मिळवत महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.
महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत.

खान शबाना ७.९५ (प्रथम) मोहळकर कृष्णा ७.८४ (द्वितीय) हुळहुळे मयुरी ७.८० (तृतीय) बी.फार्मसीचा निकाल जाहीर झाल्याची माहिती महाविद्यालय परीक्षा अधिकारी डॉ. प्रसाद घुगरकर व अंतर्गत परीक्षा विभाग प्रमुख डॉ.रोशनी सूर्यवंशी यांनी दिली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. विनय पाऊलबुधे, उपाध्यक्ष श्री. रामभाऊ बुचकुल, सचिव श्री. रामकिसन देशमुख, खजिनदार श्री. दादासाहेब भोईटे, व्यवस्थापकीय संचालक श्री. साई पाऊलबुधे सदस्य श्री.रघुनाथ कारमपुरी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. श्याम पंगा तसेच डी.फार्मसीच्या प्राचार्या डॉ. अनुराधा चव्हाण यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

विभागप्रमुख डॉ.कोला वेणू तसेच स्वाती कडनोर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# काळभैरवनाथ दिंडीचे पंढरपूरला प्रस्थान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** ब्रह्मकालिन तात्या महाराज यांच्या आशिर्वादाने तसेच समस्त ग्रामस्थ देऊळगाव गलांडे यांच्या सहकार्याने व तात्या महाराज काटकर यांच्या मार्गदर्शनाने श्री क्षेत्र देऊळगाव गलांडे,ता.श्रीगोंदा ते पंढरपुर पायी दिंडी सोहळाचेप्रस्थान झाले दिंडीचे हे ५ वे वर्ष आहे यामध्ये पंचक्रोषीतील असंख्य भाविक सहभागी झाले

दिंडीमध्ये तात्या काटकर महाराज,केशव महाराज बावर,दत्तात्रय महाराज गव्हाणे,अश्विनीताई महाराज रणसिंग,अक्षय महाराज पवार, दत्तात्रय महाराज गव्हाणे आदी सहभागी आहेत.दिनांक २६ जुलै रोजी अश्विनीताई रणसिंग महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर रामराव महाराज गलांडे यांचा काल्याचा महाप्रसाद होईल व दिंडीची सांगता होईल.

दिंडी सोहळाचा पंढरपूर येथील मुक्काम गडदे बिरू विटभट्टी,मोठा विठ्ठल शेजारी,पंढरपुर येथे राहणार आहे.

# महाविद्यालयाजवळ तंबाखूजन्य पदार्थांची विक्री; अनिस टी हाऊस चालकाविरुद्ध पोलिसांचा गुन्हा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पिंपळवाडी फाटा परिसरातील नर्मदा महाविद्यालयाच्या १०० मीटर अंतराच्या आत तंबाखूजन्य पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी पैठण पोलिसांनी अनिस टी हाऊसच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिस मसूद शेख (वय ३८, रा. अकबरनगर, मुधलवाडी, ता. पैठण) हा पिंपळवाडी फाटा येथील अनिस टी हाऊसमध्ये विद्यार्थ्यांची ये-जा असलेल्या परिसरात कायद्याने बंदी असतानाही तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याचे निदर्शनास आले.
त्यानुसार २० जुलै रोजी रात्री कारवाई करण्यात आली.
या कारवाईत १२ गायछाप तंबाखूच्या पुड्या (किंमत १२० रुपये) तसेच ब्रिस्टॉल कंपनीच्या सिगारेटचे एक पाकीट (किंमत ८० रुपये) असा एकूण २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
याप्रकरणी पोलिस कर्मचारी मिलिंद काकासाहेब घाटेश्वर यांच्या फिर्यादीवरून पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २३४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ (जाहिरात प्रतिबंध, व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण नियमन) अधिनियम, २००३ मधील कलम ६(ब) व २४ अन्वये कारवाई करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## शब्दकोडे क्रमांक : १२

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | | ४ | ■ | ५ | ६ | ७ |
| | ■ | | ■ | ८ | | ■ | ९ | १० | ■ | ११ | |
| १२ | १३ | ■ | १४ | ■ | १५ | | ■ | १६ | १७ | | ■ |
| ■ | १८ | १९ | ■ | २० | | ■ | २१ | ■ | | ■ | २२ |
| २३ | ■ | २४ | २५ | | ■ | २६ | | | ■ | २७ | |
| २८ | | | | ■ | २९ | | | ■ | ३० | ■ | |
| | ■ | | ■ | ३० | | | ■ | ३१ | | ३२ | ■ |
| ■ | ३३ | ■ | ३४ | ■ | | ■ | ३५ | | ■ | ३६ | |
| ३७ | | ३८ | ■ | ३९ | ■ | ४० | | ■ | ४१ | | ■ |
| | ■ | ४२ | ४३ | | ४४ | ■ | ४५ | | ■ | ४६ | ४७ |
| ■ | ४८ | | | ■ | ४९ | ५० | | ■ | ५१ | ■ | |
| ५२ | | | ■ | ५३ | | | ■ | ५४ | | | |

**आडवे शब्द :** १. भारतातील एक राज्य ३. जगात सर्वात लोकसंख्या असलेला देश ५. जगातील सर्वात लांब नदी ८. सूत ९.समूह ११.नंतर १२.वेल १४ गाईच्या दुधापासून बनवतात १५.गडद रंगाचा १६.शेरोशायरी असलेल्या गाण्याचा एक प्रकार १८.तमाश्यात सादर होणारे नाट्य २०.तातडीचा संदेश पूर्वी पोस्टद्वारे यायचा त्यास म्हणतात २४.थेट २६.राजवाडा २७.वयोगटाचे बंधन नसलेला २८.देश चालवणारे शासन २९.तोरा ३० पाण्याने भरलेला माठ ३१.जखमी ३४.स्वतः स उच्चारून वापरलेला एक शब्द ३५.बनाव ३६.वडी ३७.हिंदीत-स्फोटक ४०.कर्म ४१.गाडीचे पाय ४२.गावठी ४५.आमटी ४६.जोम ४८.नबाग-उलट लिहा ४९विष्णू ५२.निकड ५३.कंगण ५४.दक्ष **उभे शब्द :** १. एक जगप्रसिद्ध सर्च इंजिन २.लफडा ३.भाग देण्याची क्रिया ४.जम ६ हिंदीत-चिंच ७. बंध दृष्टी १३.१७. आमटी वाढण्यासाठी वापरतात १९.भूतकाळ २०.दुधापासून बनवतात ते पाचक पेय २१.जगातील सर्वात मोठे वाळवंट २२.बोली लावून करण्यात येणारी विक्री २३.गाईचे पिल्लू २५.हिंदीत-भीती २६ गणेशोत्सवात सजवलेले थर्माकोलचे मंदिर २९. शहर ३०. माता जखम त्वरित ३३. शिकवण देणारा ३५. मरेपर्यंत ३७. वडील ३८. धोका देणारा ३९. रवा पासून बनवतात तो गोड पदार्थ ४३. रान ४४. स्वर्ग-विरुद्ध ४७.आभाळ ४८. फळाच्या आतील प्रकाश ५०. धान्य मोजण्याचे एक प्रमाण ५१. परमेश्वर

### शब्दकोडे क्रमांक : ११ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हि | रा | ■ | भि | का | री | ■ | आ | शि | या | ■ | प |
| र | व | का | ■ | ज | ■ | ड | ■ | का | ■ | ता | ट |
| क | ण | ■ | स | वा | ल | ■ | स | र | का | र | ■ |
| णी | ■ | का | ल | ■ | ड | फ | ली | ■ | ठी | ■ | पा |
| ■ | हॉ | ■ | ग | ल | का | ■ | म | न | ■ | न | ट |
| फ | की | र | ■ | स | ■ | बी | ■ | म | न | न | ■ |
| ट | ■ | व | सा | ■ | फी | ■ | क | न | क | ■ | वा |
| क | ट | ■ | ह | सू | ■ | खे | द | ■ | ल | वा | द |
| ळ | ■ | वे | स | ■ | मा | ■ | म | ती | ■ | र | न |
| ■ | पा | ढा | ■ | वा | व | र | ■ | स | र | स | ■ |
| पा | प | ■ | भो | व | ळ | ■ | दा | ■ | म | दा | र |
| क | णी | दा | र | ■ | ता | व | दा | न | ■ | र | ■ |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अरणगाव येथे २६ जुलैला द्वादशीला रथयात्रा



अहिल्यानगर- आषाडी एकादशीचा उपवास सोडण्यासाठी द्वादशीला साक्षात पांडुरंग नगरजवळील अरणगाव(मेहराबाद)येथील श्री संत बुवाजी बुवा महाराज मंदिरात येतात अशी आख्यायिका आहे. त्यामुळे येथे दरवर्षी मोठा उत्सव होत असतो, परिसरातील व नगरमधील सुमारे २५ हजार भाविक येथे दरवर्षी उपवास सोडण्यासाठी येतात. तर देवस्थान ट्रस्टच्या वतीने दरवर्षी आषाडी एकादशी निम्मित द्वादशीच्या दिवशी गावात रथयात्रा काढण्यात येते संतांची पावन भूमी असलेल्या अरणगांव येथे श्री संत बुवाजीबुवा महाराज व अवतार मेहेरबाबा यांच्या संजीवन समाधी असलेल्या पुण्यभूमीत आषाढी सप्ताह,अखंड हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रारंभ झाला असून,दैनंदिन कार्यक्रम सुरु झाले असून दररोज काकडा भजन,विष्णु सहस्त्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण,प्रवचन, हरिपाठ आरती, कीर्तन नंतर गावोगावीचे जागर होतो रात्री कीर्तन होत आहे दि.२५ जुलै रोजी पहाटे ५.३० वा.अभिषेक व एकादशी महापूजा खासदार निलेश लंके,पोपट विठ्ठल पुंड(सरपंच, अरणगांव) यांच्या हस्ते एकादशी पूजा होणार आहे, दि२६ जुलै रोजी पहाटे ५.३०वा.महापुजा द्वादशीलाआ अक्षय कर्डीले,जेष्ठ नेते भानुदास कोतकर यांचे हस्ते होणार आहे. तर दुपारी रथ मिरवणूक पूजा दत्त देवस्थान सत्संग मंडळ, अहिल्यानगर, मा. खा.डॉ. सुजयदादा विखे , आ. काशीनाथ दाते , आ.श्री. संग्रामभैय्या जगताप , श्री. जगन्नाथ देवकर, .श्री. अभय आगरकर,श्री. संदेश कार्ले साहेब (जि.प. सदस्य, अ.नगर), सौ. सुवर्णाताई कोतकर (माजी उपमहापौर) श्री. भगवानराव फुलसौंदर, श्री. कुमार भाऊ वाकळे, अवतार महेरेबाबा ट्रस्टचे विश्वस्त श्री. रमेश जंगले , श्री. राजु प्रसाद, श्री. मेहेरनाथजी कलचुरी , श्री. जाल पी. दस्तुर, श्री. यैव्हान साहेब, श्री. राजेंद्र मेहेर, देवस्थानचे अध्यक्ष श्री. नवनाथ गहीले, उपाध्यक्ष श्री. नाना करांडे व सर्व विस्वस्त मंडळ व समस्त ग्रामस्थ अरणगांव या मान्यवरांच्या हस्ते होईल.

### वारकड यांचा पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने सत्कार



अहिल्यानगर -अहिल्यानगर जिल्ह्यात पूर्वीपासूनच साहित्यिक चळवळ जोमाने काम करीत आहे. पुणे येथील काव्ययोग काव्य संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या ,''महाराष्ट्राचा लाडका कवी'' या स्पर्धेत राज्यातून १८७ कवींनी सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत अहिल्यानगरचे कविवर्य दत्तात्रय वारकड यांची बहुमताने महाराष्ट्राचा लाडका कवी म्हणून झालेली निवड अहिल्यानगर जिल्हाला भूषणावह अशी ठरली आहे. श्री.वारकड यांच्या संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या जीवनावरील ''ज्ञानज्योत'' या कवितेला रशिया दुबई तसेच देशातील अनेक राज्यातून भरभरून प्रतिसाद मिळाला. कविवर्य दत्तात्रय वारकड अहिल्यानगरचे भूषण ठरले आहे.असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट चे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने ''महाराष्ट्राचा लाडका कवी'' प्रथम पुरस्कार विजेते कवीवर्य दत्तात्रय वारकड यांचा सत्कार पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्टचे संस्थापक वसंत लोढा यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल,महावीर कांकरिया, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संचालक बाबासाहेब साठे, विश्वहिंदू परिषद जिल्हा प्रसिद्धीप्रमुख आदी उपस्थित होते.

### लोकशाहीवरील उपरोधिक भाष्य करणारे 'मंकी बात' प्रथमच अहिल्यानगरात

अहिल्यानगर - सध्याच्या लोकशाही व्यवस्थेतील सत्तासंघर्ष, स्वार्थी राजकारण, भ्रष्टाचार आणि सामान्य नागरिकांच्या संघर्षावर उपरोधिक भाष्य करणारे गाजलेले व्यंगनाट्य 'मंकी बात' प्रथमच अहिल्यानगरकरांच्या भेटीला येत आहे. समाजातील वास्तवावर मार्मिक भाष्य करत प्रेक्षकांना हसवतानाच विचार करायला भाग पाडणारे हे नाटक शनिवार, २५ जुलै २०२६ रोजी ऊर्जा रंगभवन येथे रंगणार आहे. नाटकाचे दोन प्रयोग आयोजित करण्यात आले असून पहिला प्रयोग सायंकाळी ६ वाजता तर दुसरा रात्री ८.३० वाजता होणार आहे. सन्मानिकांसाठी ९३२५५६७१०० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शिवसेनेच्या सामान्य कार्यकर्त्याचा असामान्य उपक्रम, शिर्डीत विद्यार्थ्यांसाठी मोफत वाचनालय सुरू



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिर्डी शहरातील तरुण पिढीमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सध्या मोबाईलच्या आहारी गेलेल्या विद्यार्थ्यांना महापुरुषांच जीवनचरित्र आणि ग्रंथांचा अभ्यास व्हावा या उद्देशाने ए एल संघर्ष प्रतिष्ठान, शिर्डी यांच्या वतीने शिर्डी येथे मोफत वाचनालय सुरू करण्यात आले असल्याची माहिती शिर्डी येथील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे कार्यकर्ते अमोल लोंढे यांनी दिली अमोल लोंढे म्हणाले की पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पा.,डॉ. सुजय विखे पा.,शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते यांच्या मार्गदर्शनाखाली वाचनालय सुरू करण्यात आले असून कथा, कादंबरी, आत्मचरित्र, विज्ञान, इतिहास तसेच चालू घडामोडींवरील पुस्तके, दैनिक वर्तमानपत्रे आणि विविध मासिके विद्यार्थ्यांसाठी कोणतेही शुल्क न आकारता मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

वाचनालय सर्व विद्यार्थी, युवक आणि नागरिकांसाठी मोफत खुले राहणार आहे. पुस्तकांमुळेच व्यक्ती घडते. आर्थिक अडचणीमुळे कोणतेही विद्यार्थी वाचनापासून वंचित राहू नये यासाठी आम्ही हे मोफत वाचनालय सुरू केले आहे. उद्घाटनप्रसंगी परिसरातील अनेक विद्यार्थी, पालक आणि राहता तालुका अध्यक्ष सागर बोठे ,पांडुरंग गुंजाळ ,नगरसेवक नितीन कोते , पत्रकार सतिश वैजापूरकर, राहुल गोंदकर ,प्रतिक शेळके, सचिन जाधव ,निखिल घुगे, प्रसाद सुरजे , रवि शेजवळ, संदीप शेजवळ,कुनाल धिवर मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## श्रीकृष्णनगरवासीयांचा अनेक वर्षांपासूनचा लोंबणाऱ्या विजेच्या तारांचा प्रश्न मार्गी

### नागरिकांकडून नगरसेवकांचे आभार!



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला श्रीकृष्णनगर येथील घरांवर लोंबणाऱ्या विजेच्या तारांचा प्रश्न अखेर शिर्डी नगरपरिषदेचे नगरसेवक तथा बांधकाम सभापती अरविंद आप्पा कोते,नगरसेवक धनराज कैलासबापू कोते,गटनेत्या सौ प्रतिक्षाताई किरण कोते,नगरसेविका सौ छायाताई सुधीर शिंदे यांच्या माध्यमातून मार्गी लागल्याने श्रीकृष्णनगर मधील नागरिकांनी या नगरसेवकांचे आभार मानले आहेत

गेल्या अनेक वर्षांपासून श्रीकृष्णनगर येथील रहिवासी नगरामधे महावितरणच्या विजेच्या तारा अनेक घरांवर लोंबत असल्याने तसेच अनेक घरांच्या गच्चीवर व थेट गॅलरी मधे या घातक विजेच्या तारा पोहोचल्याने पाऊस आणि वारा आला की अक्षरशः ठिणग्या उडत असल्याने नागरिक भीतीच्या छायेत वावरत होते.

प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते,माजी उपनगराध्यक्ष विजय कोते यांनी अनेकदा याबाबत प्रामाणिक पाठपुरावा केला संबंधित रक्कम भरली मात्र काही नागरिकांचा विरोध असल्याने काम प्रलंबित राहिले परंतु बांधकाम सभापती अरविंद आप्पा कोते व सहकारी नगरसेवकांनी पुन्हा ना राधाकृष्ण विखे पाटील व डॉ सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून पुढाकार घेत नागरिकांना विश्वासात घेतले आणि महावितरणच्या सहकार्याने आज अखेर प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. नगरसेवक अरविंद आप्पा कोते यांनी सांगितले की ना राधाकृष्ण विखे पाटील व डॉ सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागल्याचे समाधान असून आम्ही सर्व नगरसेवक प्रभागातील नागरिकांच्या प्रत्येक समस्यांची सोडवणूक नक्कीच करून दाखवू असे आश्वासन दिले.

## 'समर्पण चातुर्मास २०२६'ची नांदी; सारसनगरात प्रविणऋषीजींचे मंगल आगमन

### 'सारसनगर हा अहिल्यानगरातील जैन समाजाचा अभिमानाचा गड; येथील प्रत्येक कुटुंबाचा उत्स्फूर्त सहभाग




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** परमपूज्य उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज साहेब तसेच मधुरकंठी पूज्य तीर्थेशऋषीजी महाराज साहेब यांच्या पावन सान्निध्यात होणाऱ्या **'समर्पण चातुर्मास २०२६'**च्या निमित्ताने धर्मयात्रेदरम्यान रविवारी (दि. १९ जुलै) सारसनगर येथे त्यांच्या मंगलमय आगमनाचे अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि जल्लोषपूर्ण स्वागत करण्यात आले. संपूर्ण परिसरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे अद्वितीय वातावरण अनुभवायला मिळाले.

या स्वागत सोहळ्यानिमित्त महात्मा फुले चौकापासून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांचे आकर्षक कलश पथक, चौदा स्वप्न मंडळ, अष्टमंगल मंडळ, अर्हम विज्जा मंडळ, आगम मंडळ, पाठशाळेतील बालक–बालिका, भक्तामर मंडळ, युवक मंडळ तसेच हजारो श्रावक–श्राविका यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शोभायात्रा भक्तिमय वातावरणात पार पडली. मार्गावर उभारण्यात आलेल्या स्वागत कमानी, रंगीबेरंगी रांगोळ्या, भजन संगीतची धून आणि जयघोषांच्या गजरात गुरुदेवांचे स्वागत करण्यात आले.

हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांचा उत्साह पाहून पूज्य गुरुदेवांनी सारसनगरवासीयांचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी आगामी 'समर्पण चातुर्मास २०२६' मध्ये प्रत्येकाने तन, मन आणि भावनेने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. आपल्या प्रेरणादायी प्रवचनात त्यांनी ''कंकर कभी सफल नहीं होता और बीज कभी निष्फल नहीं होता'' या प्रभावी उक्तीच्या माध्यमातून प्रत्येकाने जीवनात बीजाप्रमाणे स्वतःला समाजासाठी समर्पित करून यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवन जगावे, असा संदेश दिला.

दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमादरम्यान पूज्य महाराज साहेबांनी बालक, युवक, सुव्रती, महिला तसेच श्रावक–श्राविका यांच्याशी सविस्तर धर्मचर्चा केली. समाजासमोरील विविध आव्हाने, बदलती जीवनशैली, संस्कारांचे महत्त्व आणि धर्माधिष्ठित जीवन याविषयी त्यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष श्री. अशोक (बाबुशेठ) बोरा यांनी आपल्या मनोगतात सारसनगरवासीयांच्या एकजुटीचे विशेष कौतुक करत सांगितले की, ''सारसनगर हा अहिल्यानगरातील जैन समाजाचा खऱ्या अर्थाने गड आहे. आज केवळ स्वागत सोहळा झाला नाही, तर संपूर्ण परिसराने आपल्या श्रद्धा, संस्कार आणि संघटित शक्तीचे दर्शन घडवले आहे. पाच वर्षांच्या चिमुकल्यांपासून ते किशोरवयीन मुले–मुली, युवक, युवती, माता–भगिनी आणि ज्येष्ठ नागरिक अशा प्रत्येक घटकाने एकत्र येऊन गुरुदेवांचे जे भव्य स्वागत केले, ते संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. आजची ही उपस्थिती आणि प्रत्येकाच्या डोळ्यांतील समर्पणाची भावना मला विश्वास देते की, सारसनगर परिसर आगामी 'समर्पण चातुर्मास २०२६'ला इतिहासातील सर्वात भव्य, दिव्य आणि अभूतपूर्व यश मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावेल.''

यावेळी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण करत त्यांनी सर्वांना जोशपूर्ण घोषणा देण्याचे आवाहन केले. हजारो भाविकांनी एकमुखाने घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला ''चातुर्मास किसका? चातुर्मास हमारा!!''

संघाचे सेक्रेटरी श्री. दिलीप मेहेर यांनी आपल्या प्रास्ताविकातून गुरुदेवांच्या आगमनाविषयीची आतुरता आणि आगमनाने लाभलेल्या आध्यात्मिक आनंदाच्या भावना व्यक्त केल्या. संघाचे अध्यक्ष श्री. कांतीलालजी गांधी यांनीही मनोगत व्यक्त करत सर्वांचे स्वागत केले. श्री. सागर गुंदेचा यांनी प्रभावी सूत्रसंचालन करून तर प्रवीण शिंगवी यांनी त्यांच्या गुरुदेवांना समर्पित गीताने कार्यक्रमात रंगत आणली, तर युवक मंडळाच्या वतीने श्री. किरण भंडारी यांनी आभार प्रदर्शन केले.

## आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनकडून गणेश तनपुरे यांना महा ॲक्युपंक्चर रत्न २०२६ पुरस्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन () च्या वतीने ॲक्युपंक्चर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध ॲक्युपंक्चरिस्ट तथा आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे जिल्हा सचिव श्री गणेश निवृत्ती तनपुरे यांना प्रतिष्ठेचा महा ॲक्युपंक्चर रत्न २०२६ पुरस्कार प्रदान करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात १९ जुलै रोजी झालेल्या भव्य पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा सन्मान देण्यात आला.

ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीचा प्रसार, रुग्णसेवा आणि आरोग्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत श्री गणेश तनपुरे यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्यभरातून आलेल्या मोठ्या संख्येने ॲक्युपंक्चर थेरपिस्ट, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मराठी चित्रपट अभिनेते डॉ. सुयोग गोऱ्हे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, ॲड. दत्तात्रय जाधवर आणि ॲड. नागेश सोनुने उपस्थित होते.

यावेळी मंचावर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे चेअरमन डॉ. सतीश कराळे, व्हाईस चेअरमन डॉ. नितीनराजे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, डॉ. अभिजित कवठकर, श्री प्रशांत सावंत, सौ. दिशा चव्हाण, श्री विजय नवल पाटील, श्री तुषार वाघूळदे, डॉ. राजेंद्र गोऱ्हे तसेच संस्थेचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

श्री गणेश तनपुरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीद्वारे रुग्णांना प्रभावी सेवा देत आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार त्यांच्या सेवाभावी वृत्तीची आणि व्यावसायिक उत्कृष्टतेची पावती मानला जात आहे. या मानाच्या पुरस्काराबद्दल वैद्यकीय क्षेत्र, सामाजिक संस्था, सहकारी, मित्रपरिवार आणि विविध स्तरांतील मान्यवरांकडून श्री गणेश निवृत्ती तनपुरे यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## प्रेम भारती नगर येथे सुमारे ४५ लाखांच्या बौद्ध विहाराचे भूमिपूजन; आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नांना यश

### मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या पाठपुराव्यामुळे कामाला सुरुवात
### धार्मिकतेतून समाजात एकात्मतेचा संदेश; विकासकामांमुळे प्रभागाचा कायापालट – कुमारसिंह वाकळे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक ८ मधील प्रेम भारती नगर येथे आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष प्रयत्नातून आणि मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सुमारे ४५ लाख रुपये खर्चाच्या भव्य बौद्ध विहाराच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले. या कामामुळे परिसरातील नागरिकांना धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक उपक्रमांसाठी स्वतंत्र वास्तू उपलब्ध होणार असून प्रभागाच्या विकासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे.

यावेळी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे, नगरसेवक सुरेश बनसोडे, नगरसेविका सुनीता भिंगारदिवे, आशाताई कातोरे, किसन भिंगारदिवे, सुनील भालेराव, पंकज लोखंडे, सनी कदम, उत्तम भिंगारदिवे, योगेश भोसले, बाळासाहेब गायकवाड, रवी चाबुकस्वार, शिवाजी भोसले, बाबासाहेब डोळस, उत्तम आडसुळ, रमेश पगारे, रामदास धिवर, रमेश सूर्यनारायण, सचिन कदम, आकाश देशमुख, रोहित वाकळे, अक्षय वाटमोडे, रामदास खरात, महेश वैद्य, बाळू बनकर, गौरव भिंगारदिवे, अलका पगारे, माया जाधव, सारिका गांगुर्डे, दिपाली भोसले, अनिता नांगरे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलताना मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे म्हणाले की, बोल्हेगाव आणि नागापूर या गावांना नियोजनबद्ध विकासकामांच्या माध्यमातून शहरीकरणाचे रूप प्राप्त करून देण्यात आले आहे. कायमस्वरूपी ची विकासकामे झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर नागरिक येथे वास्तव्यास येत आहेत. या सर्व विकासकामांसाठी आमदार संग्राम जगताप यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून मोलाचे सहकार्य केले आहे.

ते पुढे म्हणाले की, २०१४ साली बोल्हेगाव येथे प्रभागातील पहिले बौद्ध विहार उभारण्यात आले होते. आता प्रेम भारती नगर येथे सुमारे ४५ लाख रुपये खर्चून आणखी एक भव्य बौद्ध विहार उभारला जात असून या कामासाठी आमदार संग्राम जगताप यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. समाजमंदिर, सभामंडप आणि बौद्ध विहार यांसारख्या धार्मिक–सामाजिक वास्तूंमधून समाजामध्ये एकात्मतेचा संदेश दिला जातो. समाजबांधव एकत्र येऊन चांगल्या विचारांची देवाणघेवाण करतात. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालल्यास जीवनात कोणतीही अडचण येत नाही.

कुमारसिंह वाकळे पुढे म्हणाले की, प्रभागातील मूलभूत प्रश्नांपासून विकासकामे मार्गी लावण्यात आली असून आता कॉँक्रिटीकरणाच्या रस्त्यांची कामे सुरू आहेत. दहा वर्षांपूर्वी या परिसरात कोणतीही विकासकामे नव्हती. शून्यापासून विकास करण्याची वेळ आली होती. मात्र आज नियोजनबद्ध विकासामुळे संपूर्ण प्रभागाचा कायापालट होत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

नगरसेविका सुनीता भिंगारदिवे म्हणाल्या की, कुमारसिंह वाकळे यांनी विकासकामांच्या माध्यमातून संपूर्ण प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व जाती–धर्मातील नागरिकांचा विश्वास त्यांनी संपादन केला आहे. त्यांच्या पाठपुराव्यामुळे बौद्ध विहाराचे काम मार्गी लागत असून भविष्यात या ठिकाणी विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर आयोजित केले जातील.

नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे म्हणाले की, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबरोबरच विकासकामांना प्राधान्य देण्यात येत आहे. कुमारसिंह वाकळे यांच्या माध्यमातून प्रेम भारती नगरमध्ये भव्य बौद्ध विहार उभा राहत असून हा समाजासाठी अभिमानाचा विषय आहे.

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, समाजाला एकत्र येण्यासाठी आणि विविध धार्मिक–सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी बौद्ध विहाराची निर्मिती होत आहे. या महत्त्वपूर्ण कामासाठी आमदार संग्राम जगताप आणि कुमारसिंह वाकळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

### जंतर-मंतरवर पेपर फुटी, व शिक्षण व्यवस्थेतील

# गैरव्यवहाराविरुद्धच्या आंदोलनकर्त्यांवरील कारवाईचा निषेध




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिल्ली येथील जंतर-मंतरवर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व शास्त्रज्ञ सोनम वांगचुक, विद्यार्थी नेत्या कॉ. नेहा बोरा, अभिजित दिपके आणि इतर आंदोलनकर्त्यांवर होत असलेल्या कथित दडपशाहीच्या निषेधार्थ भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी-लेनिनवादी) लिबरेशनच्या वतीने आज अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करून येऊन निवेदन आली.

यावेळी आंदोलकांनी शिक्षणमंत्र्यांचा धिक्कार असो, मोदी सरकार हाय हाय, शिक्षण मंत्री राजीनामा द्या, आंदोलनकर्त्यांवरील दडपशाही बंद करा, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या सरकारचा धिक्कार असो अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.निदर्शनानंतर आंदोलकांच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेचे नायब तहसीलदार मयूर बेरड यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.

निवेदनात सोनम वांगचुक, कॉ. नेहा बोरा व इतर आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. तसेच नीट (), यूजीसी-नेट, टीईटी, पोलीस भरती व इतर स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांची स्वतंत्र न्यायिक चौकशी करावी, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, पेपरफुटीविरोधी कठोर कायदा करावा,पाशवी बळावर लोकशाहीची गळचेपी थांबवा, शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवावे आणि अशा मागण्याही करण्यात आल्या.

यावेळी केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. आंदोलनकर्त्यांवरील दडपशाही, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे होत असलेले दुर्लक्ष आणि शिक्षण क्षेत्रातील वाढत्या भ्रष्टाचाराचा त्यांनी निषेध करण्यात आला.

आंदोलनात कॉ. राजेंद्र बावके, कॉ. राजू वैराळ, कॉ. मदिना शेख, कॉ. जीवन सुरुडे, कॉ. विनायक गोरखे, अनिल बोरसे,आकाश शिंदे,आसरू बर्डे,विजय राहीज,गणपत जाधव, बाळासाहेब खाडे, भास्कर जाधव, शिवाजी पवार, बजरंग गुंड, राहुल पवार आधी सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन हा उपक्रम कौतुकास्पद – डॉ.दिलीप टीपरसे

### पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त रामकरण सारडा विद्यार्थीगृहात वृक्षारोपण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** वातावरणातील बदल पाहता यंदाचा पावसाळा हा एक महिना उशिरा आहे. तसेच वनक्षेत्रातील व रहिवासी परिसरातील झाडेही कमी झालेली दिसत आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष संवर्धन करणे व वृक्षारोपण करणे आवश्यक आहे.पंडित दीनदयाळ परिवार ट्रस्ट व अनुलोम संस्थेच्या वतीने शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचे कार्यक्रम होत आहेत.ही कौतुकास्पद बाब आहे.पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान हा भावनिक रित्या परिवार म्हणून जोडला असल्याने सामाजिक कार्यात मोठ्या प्रमाणात हातभार लावण्याचे कार्य होत आहे.फक्त झाडे लावून न थांबता त्यांचे संगोपन व्हावे. या दृष्टीने पंडित दीनदयाळ परिवाराने केलेले वृक्षारोपणाचे कार्य प्रेरणादायी असे आहे.पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचा वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन हा उपक्रम शहराला दिशा देणारा आहे.

पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देववृक्ष लागवड व संवर्धन अभियानांतर्गत सिव्हील हडको येथील रामकरण सारडा विद्यार्थीगृहात कडूलिंबा,करंजी, वड,जांभूळ,आवळा,सा नचाफा,बहावा या

देववृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी जिल्हा पोलीस उपअधीक्षक डॉ.दिलीप टिपरसे,पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा,हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा,सारडा महाविद्यालयाचे जुनिअर कॉलेजचे चेअरमन मधुसूदन सारडा,अनंत देसाई,पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट चे अध्यक्ष धनंजय तागडे,सचिव बाळासाहेब भुजबळ,कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल,उपाध्यक्ष अशोक कानडे,राहुल जामगावकर, मिलिंद कोलते,महावीर कांकरिया,निलेश चिपाडे,उदय अनुभुले, सोमनाथ चिंतामणी, किशोर गांधी ,विलास नंदी, अनुलोम संस्थेचे अमोल अवस्थी,भाजपाचे मुकुल गंधे ,सचिन पारखी,प्रशांत मुथा,रामकरण सारडा विद्यार्थी गृहाचे अधीक्षक बंडू भोसले,हरियाली चे सुरेश खामकर आदी उपस्थित होते.

वसंत लोढा म्हणाले, महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व अनुलोम संस्थेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी ५५६ झाडे लावण्यात येणार आहेत. याचाच एक भाग म्हणून रामकरण सारडा विद्यार्थी गृहात वृक्षारोपण करण्यात आले.शहरात झाडे लावून ती संवर्धन करण्यात यावी. झाडांचे संगोपन व संरक्षण व्हावे.यासाठी ट्री गार्ड ही बसविण्यात आले आहेत.तसेच परिसरातील नागरिकांनी झाडे दत्तक घेऊन झाडांची निगा राखून संवर्धन करण्यासाठी जबाबदारी देण्यात आली आहे.

ब्रिजलाल सारडा, महाराष्ट्राच्या विकासाला गती देण्याचे कार्य महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचा उपक्रम शहराला दिशा देणारा आहे. झाडे लावा झाडे जगवा ही संस्कृती शहरात रुजविण्याचे कार्य या माध्यमातून होत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात धनंजय तागडे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाला चालना देऊन महाराष्ट्राला दिशादर्शक असे कार्य केले आहे. त्यांच्या जन्मदिनानिमित्त शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहे. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक उपयोगी उपक्रम घेतले जातात.

सचिन पारखी म्हणाले, पर्यावरण पूरक वृक्षारोपणाचा कार्यक्रम शहराला हरित नगर करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.या कार्यक्रमातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा देण्यात आले आहेत.

राहुल जामगावकर यांनी सूत्रसंचालन केले तर आभार बाळासाहेब भुजबळ यांनी मानले.

# अखंडित खत वाटपासाठी कृषी विभागाचे नियोजन; पारनेर तालुक्यात शेतकऱ्यांना सुरळीत खत पुरवठा



**‘तालुक्यात युरिया खताचा २८८ मेट्रिक टन संरक्षित साठा उपलब्ध असून त्याचे नियोजनबद्ध वाटप सुरू आहे. विविध कंपन्यांच्या ४६० मेट्रिक टन खतांचाही पुरवठा करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी घाबरून न जाता आवश्यकतेनुसारच खत खरेदी करावे.’’**

**गजानन घुले**
**तालुका कृषी अधिकारी, पारनेर**

**‘कोणत्याही प्रकारची लिंकिंग न करता आधार कार्ड व मोबाईल क्रमांकाच्या आधारे पीओएस मशीनवरून युरिया व इतर खतांचे वाटप सुरू आहे. शेतकऱ्यांनी नॅनो युरियाचाही वापर करून कृषी विभागाला सहकार्य करावे.’**

**अविनाश पायमोडे**
**श्री ढोकेश्वर कृषी उद्योग, टाकळी ढोकेश्वर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर –** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यात शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा अखंडित व सुरळीत पुरवठा व्हावा, यासाठी कृषी विभागाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री सुधाकर बोराळे, कृषी विकास अधिकारी श्री सुधीर शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक नियोजन केले आहे. तालुक्यात कोणत्याही प्रकारची खतटंचाई निर्माण होऊ नये तसेच शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार वेळेत खते उपलब्ध व्हावीत, यासाठी कृषी विभाग सातत्याने देखरेख व समन्वय ठेवून कार्यरत आहे.

तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या तालुक्यात युरिया खताचा २८८ मेट्रिक टन संरक्षित साठा उपलब्ध असून त्याचे नियोजनबद्ध वाटप सुरू आहे. तसेच विविध कंपन्यांच्या ४६० मेट्रिक टन खतांचा पुरवठा करण्यात आला असून पुढील साठाही टप्प्याटप्प्याने उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी खतांच्या उपलब्धतेबाबत कोणतीही चिंता करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

कृषी विभागाने खत उत्पादक कंपन्या, अधिकृत खत विक्रेते व संबंधित अधिकाऱ्यांच्या समन्वयातून संपूर्ण नियोजन केले आहे. प्रत्येक खत विक्री केंद्रावर पुरेसा साठा उपलब्ध राहील, यासाठी दक्षता घेण्यात येत असून शेतकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

खत खरेदी करताना शेतकऱ्यांनी आधार कार्ड व मोबाईल क्रमांक सोबत ठेवावा. सर्व खतांचे वाटप पीओएस मशीनद्वारे केले जात असून प्रत्येक व्यवहाराची ऑनलाइन नोंद होत आहे. कोणत्याही प्रकारची लिंकिंग न करता आधार कार्ड व मोबाईल क्रमांकाच्या आधारे युरिया व इतर खतांचे वितरण करण्यात येत असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्याकडूनच खत खरेदी करून पावती घ्यावी. तसेच कोणत्याही विक्रेत्याने जादा दराने खत विक्री करणे, सक्तीने इतर उत्पादने खरेदी करण्यास भाग पाडणे अथवा अन्य अनियमितता आढळल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी झालेल्या बैठकीस कृषी उपविभागीय अधिकारी आशिष दिवटे, सहाय्यक कृषी अधिकारी योगेश रोहकले, मंडळ कृषी अधिकारी, गुणनियंत्रण अधिकारी, खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच खत विक्रेते उपस्थित होते. आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# स्व. अजितदादा पवार जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे रक्तदान शिबिर; सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी उपक्रम

### रक्तदानातून समाजसेवेची परंपरा अधिक बळकट करूया– रवी दंडी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि आनंद ऋषीजी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अहिल्यानगरचे आमदार श्री संग्रामभैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाने ‘‘स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त‘‘ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्री मार्कंडेय मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारप व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिक व युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. कार्यक्रमास आनंदऋषीजी ब्लड बँकेचे सुनील महानोर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी रवि दंडी, सनी कांबळे, चैतन्य घुले, भैय्या घुले, महेंद्र कवडे, सागर शिंदे, शंकर जिंदम, मोहित गांधी, संग्राम रासकर, गौरव कचरे, अमित बिल्ला, अभिजीत येनगंदुल, प्रसाद चौधरी, रमेश केंजरला, चैतन्य सरगम, अमोल गाजेंगी, प्रवीण चौधरी, प्रथमेश दिकोंडा, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना रवि दंडी म्हणाले, ‘स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम आयोजित करणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळते. त्यामुळे प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडावे.‘‘

पुढे बोलताना रवि दंडी म्हणाले, ‘‘समाजातील युवकांनी केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता सामाजिक कार्यातही पुढाकार घ्यावा. रक्तदान, आरोग्य शिबिरे आणि जनहिताचे उपक्रम सातत्याने राबविले तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. अशा उपक्रमांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस नेहमीच अग्रस्थानी राहील.’

आनंद ऋषीजी ब्लड बँकेचे सुनील महानोर यांनी रक्तदानाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, ‘‘रुग्णालयांमध्ये अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया तसेच थॅलेसेमिया व गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी रक्ताची सातत्याने गरज भासत असते. एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते. त्यामुळे नागरिकांनी कोणताही गैरसमज न बाळगता नियमित रक्तदान करावे.‘‘

यावेळी उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करून त्यांच्या सामाजिक योगदानाचे कौतुक केले. शिबिरात मोठ्या संख्येने युवकांनी रक्तदान करत समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व आनंद ऋषीजी ब्लड बँकेच्या कार्यकर्त्यांनी यशस्वीरीत्या केले.

(पान १ वरून)

### अन्नदात्याला सुखी ठेवण्याची केली श्रीविठ्ठल चरणी प्रार्थना

भेटताना व जय हरी...जय माऊली..म्हणत त्यांच्याशी संवाद साधताना मनस्वी आनंद झाला. या वारकर्यांना, शेतकर्यांना सुखी ठेव, चांगले आरोग्य दे व चांगला पाऊस राज्यभर होऊ दे, महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होऊ दे, अशी प्रार्थना श्रीविठ्ठल व रुक्मिणी मातेच्या चरणी केली, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. दरम्यान, सभापती प्रा. शिंदे मंगळवारी (२१ जुलै) पंढरपूर मुक्कामी होते. तेथे त्यांची विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांत परिचारक व पंढरपूर भाजप पदाधिकार्यांनी भेट घेऊन त्यांचे स्वागत केले.

### रोपाला प्रेमाच्या व्यक्तीप्रमाणे जपा उपमहापौर– ॲड. धनंजय जाधव

स्पर्धांची माहिती देत विद्यार्थ्यांना त्यामध्ये उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले.

नगरसेवक निखिल वारे यांनी पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये विद्यार्थी व पालकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे सांगितले. तसेच परिसरातील झाडे अडचणीची वाटत असली तरी ती तोडण्याऐवजी त्यांचे संवर्धन करण्याचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे यांनी पालकांनी ग्रीन सिटी मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले, तर उपाध्यक्ष भावसार सर यांनी विद्यार्थ्यांना वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.

माधवी जक्कल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत वृक्षसंवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### रक्तदान, वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियानातून स्व. अजितदादा पवारांना मानवंदना

सेंटर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात १६७ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी आमदार काशिनाथ दाते यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत, समाजहितासाठी राबविण्यात येणारे असे उपक्रम म्हणजे स्व. अजितदादा पवार यांच्या सेवाभावी विचारांना वाहिलेली खरी आदरांजली असल्याचे सांगितले.

जयंती सप्ताहानिमित्त शृंग ऋषी गड, भाळवणी येथे वृक्षसंवर्धन व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. मान्यवरांच्या हस्ते विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पुढील पिढीसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच पारनेर शहरातील वरची वेस परिसरातही वृक्षलागवड करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. याच दिवशी पारनेर शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (पंचायत समिती), महात्मा ज्योतिबा फुले पुतळा (पारनेर वेस), सेनापती बापट स्मारक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (बाजारतळ) या परिसरात स्वच्छता करून सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ, सुंदर आणि प्रेरणादायी ठेवण्याचा संदेश देण्यात आला. समाजहिताचे कार्य प्रत्यक्ष कृतीतून साकार करण्याचा संकल्प या अभियानातून व्यक्त करण्यात आला. या सर्व उपक्रमांप्रसंगी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. काशिनाथ दाते, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांतदादा गायकवाड, जिल्हा परिषद माजी सदस्य वसंतराव (वसंत) चेडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपजिल्हाध्यक्ष आर. एस. कापसे, उद्योजक दिलीप दाते, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, डॉ. प्रदीप दाते, पारनेर शहराध्यक्ष राजू औटी, उपशहराध्यक्ष सुनिल गाडगे, नगरसेवक अशोक चेडे, नगरसेवक युवराज पठारे, कांतीलाल ठाणगे, शहराध्यक्षा कविता औटी, बाळासाहेब लामखडे, देवरामशेठ मगर, पंढरीनाथ उंडे, दत्ताशेठ कुलट, विठ्ठल कवाद, मंगेश दाते, अशोक कावरे, विकास पवार, संदीप रोहोकले, सोमनाथ वरखडे, सचिन दाते, रोहिदास लामखडे, शिवराज कदम, सुभाष सासवडे, रेश्मा गलांडे, संदीप सालके, रमेश वरखडे, इंद्रभान गाडेकर, अरुण राजदेव, अक्षय गोरडे, स्वप्निल ठुबे, ज्ञानेश्वर औटी, संतोष आवारी, किरण रासकर, बाळासाहेब फटांगरे, सुभाष दुधाडे, आर.पी.आय. तालुकाध्यक्ष राजेंद्र उबाळे, सोनल कुलथे, निलम गोसावी, पिनू रोहोकले, दीपक पवार, राजू मुगदे, विकास रोहोकले, सुमित रोहोकले, पवन रोहोकले, महेश रोहोकले, नवनाथ रोहोकले, नागेश रोहोकले, हनुमंत नाबगे, सोनू कपाळे, योगेश शिंदे, राजू जाधव, बापू खरमाळे, जयेश खरमाळे, राहुल खरमाळे, माऊली उकांडे, तेजस खरमाळे, वनरक्षक भीमराव दवने, वनसेवक किशोर गुंजाळ यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तालुक्यातील विविध गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आनंदऋषीजी ब्लड सेंटरचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुनील महानोर, रेखा साळवे, मधुरा जोशी, आकाश बोडके तसेच ब्लड सेंटरच्या संपूर्ण वैद्यकीय व तांत्रिक कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

रक्तदानातून मानवतेची सेवा, वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता अभियानातून सामाजिक जबाबदारीची जाणीव या तिन्ही मूल्यांचा प्रभावी संगम या उपक्रमांतून अनुभवायला मिळाला. स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहाला औपचारिकतेपलीकडे जाऊन लोकहिताचे स्वरूप प्राप्त करून देणाऱ्या या उपक्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, पारनेर तालुक्यात हा जयंती सप्ताह समाजसेवा, पर्यावरण संरक्षण आणि लोकसहभागाचा प्रेरणादायी आदर्श ठरला.

### कर्तव्य, कार्यक्षमता आणि जनतेशी नाळ जोडणारे नेतृत्व म्हणजे स्वर्गीय अजितदादा पवार – गिरीश कुलकर्णी

नाही. लोकांच्या मनातील अपेक्षा ओळखून काम करणारा तो नेता होता. सकाळी सहा वाजल्यापासून कामाला सुरुवात करणाऱ्या त्यांच्या कार्यशैलीने अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली.

गिरीश कुलकर्णी पुढे म्हणाले की, सध्या देशातील अनेक प्रश्नांची गुंतागुंत वाढत चालली असून अशा काळात स्वर्गीय अजितदादा पवार यांच्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाची महाराष्ट्राला आणि देशाला मोठी गरज होती. ते आज आपल्यात नसले तरी त्यांनी कार्यकर्त्यांची सक्षम पिढी घडवून ठेवली आहे. त्यांचे कार्यकर्ते आजही समाजामध्ये सक्रियपणे काम करत आहेत. अहिल्यानगरमध्ये आमदार संग्राम जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक आणि पक्षाचे कार्यकर्ते त्यांच्या कार्यपरंपरेचा वारसा पुढे नेत असल्याचे दिसून येते. त्यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजाप्रती बांधिलकी जपली गेली असून हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, राज्य शासनाने स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव देशातील महापुरुषांच्या यादीमध्ये समाविष्ट केले असून त्यानिमित्त शासकीय कार्यक्रमही पार पडले आहेत. जनतेच्या प्रश्नांसाठी अहोरात्र झटणारे, कर्तृत्ववान आणि लोकाभिमुख नेतृत्व आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार कायम प्रेरणा देणारे आहेत.

ते पुढे म्हणाले की, स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विचारांना अभिवादन म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आता दरवर्षी त्यांच्या जयंतीनिमित्त मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिर आयोजित केले जाईल. रक्तदान हे श्रेष्ठदान असून सध्या रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने समाजाप्रती आपले कर्तव्य म्हणून रक्तदान करावे आणि गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी पुढाकार घ्यावा.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतींना अभिवादन केले. सामाजिक उत्तरदायित्व जपत रक्तदानाच्या माध्यमातून अनेकांना नवजीवन देण्याचा संदेश देत हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला.